नि.दि.दा. क्र.३८/२०१६
कोमल – वि.– वामन
नि.क्र.५४ आणि ६७ वर पुढे सुरु

**<u>आज दि. १६/१२/२०२५ रोजी प्रतिवादी क्र. २ ते ६ व त्यांचे विद्वान विधीज्ञ गैरहजर करिता प्रतिवादी क्र. २ ते ६ तर्फे वादीचा उलटतपास नाही.</u>**

(जी.ओ. वानखडे)
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

**<u>आज दि. १६/१२/२०२५ रोजी प्रतिवादी क्र १(अ) व ७ तर्फे वादीचा उलटतपास श्री. एम.डी. पालीवाल वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः</u>**

७. माझे शिक्षण वर्ग १० पर्यंत झाले आहे. मला इंग्रजी भाषा लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात व शपथपत्रात काय लिहीले आहे याची कोणतीही कल्पना मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील व माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या वडिलांच्या सांगण्यानुसार लिहीला आहे. माझ्या वडिलांचे नाव वासुदेव वाडकर आहे. माझे लग्न झालेले आहे. माझे लग्नानंतरचे नाव कोमल मंगेश काळे आहे. माझे लग्न सन २०१८ मध्ये झाले. दाव्यात व शपथपत्रात माझे लग्नापूर्वीचे की लग्नानंतरचे नाव लिहीले आहे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की दि. २२/०८/२०२२ रोजी माझे नाव कोमल मंगेश काळे असे होते. वाद मालमत्ता, वादी, प्रतिवादी या शब्दांबाबत मला काही समजत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी कशाबाबत साक्ष देत आहे त्याच्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, केस कशाबाबत दाखल केली याची मला कल्पना नाही. बाजीराव माझे आजोबा होते आणि वामन माझे बाबाजी होते. वामन यांना दोन मुले नामे मोरेश्वर आणि ज्ञानेश्वर व दोन मुली नामे सिंधूबाई व रेवती होत्या. सिंधूबाई आज रोजी

जिवंत नाही. सिंधूबाई हिला एक मुलगी आहे. सिंधूबाई ०९/०७/२०1७ रोजी मरण पावली. सिंधूबाई कोणत्या कारणाने मरण पावली मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की , माझी आई सिंधूबाई जिवंत असे पर्यंत तिने बाजीराव भगत यांना कोणत्याही मालमत्तेची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे  आहे की, वामन भगत यांच्या मालमत्तेमध्ये सिंधूबाई हिचा कोणताही हिस्सा नव्हता त्या कारणाने तिने मागणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई सिंधूबाई जिवंत असल्यावेळेस तिचे वामनराव यांच्या घरी जाणेस् येणे होते. ज्या मालमत्तेमधील मी हिस्स्याची मागणी केली ती मालमत्ता ती वामनराव यांच्याकडे कशी आली याच्या बाबत मला माहीती नाही. हे मला माहित नाही की, ज्या मालमत्तेमध्ये मी हिस्साची मागणी करीत आहे ती मालमत्ता वामनराव यांची स्वकष्टीत होती किंवा काय. हे म्हणणे खरे नाही की, वाद मालमत्ता ही वडिलोपार्जित मालमत्ता नाही. वाद मालमत्ता ही वडिलोपार्जित मालमत्ता होती हे दाखविण्याकरिता ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल आहे.  हे म्हणणे खरे नाही की, वाद मालमत्तेमध्ये माझा कोणताही अधिकार नाही. हे मला माहीत नाही की, वामन जिवंत असल्यावेळेस वामन व त्याची पत्नी संपूर्ण वाद मालमत्तेची वाहेपेरी करीत होते किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की, केस संबंधात कोणतेही दस्त मी कोणत्याही कार्यालयातून काढले नाही. हे मला माहीत नाही की, वाद मालमत्तेसंबंधात कागदपत्र मी कधीही बघितले किंवा काय.

**प्रतिवादी क्र १(अ) व ७  तर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः १६/१२/२०२५

**आज दि. ०६/०१/२०२६ रोजी प्रतिवादी क्र १(अ) व ७ तर्फे वादीचा उलटतपास श्री. एम.डी. पालीवाल वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः**

८. हे म्हणणे खरे नाही की, सदर दावा सुरु असतांना वामन भगत यांनी रेवती राऊत यांच्या हक्कात वाद मिळकतीचे बक्षीसपत्र करुन दिले होते. वासुदेव भास्कर वारकर हे माझ्या वडिलांचे वडील आहे. वासुदेव वारकर माझ्या वडिलांचे नाव आहे. मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बक्षीसपत्राद्वारे संपूर्ण वादमिळकत रेवती राऊत यांच्या हक्कात देण्यात आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ पासून वाद मिळकत रेवती राऊत यांच्या ताब्यात आहे. वाद मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर मालक म्हणून रेवती राऊत यांचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला बक्षीसपत्राची माहिती दि. १६/०९/२०१७ पासून आहे. हे म्हणणे खरे नाही की, बक्षीसपत्रातील मजकूराबाबत मला कोणताही आक्षेप नाही. हे म्हणणे खरे आहे की, वामन भगत त्यांच्या कुटुंबाचे कर्ता पुरुष होते. हे मला माहीत नाही की, वामन भगत यांनी माझ्या आईचे लग्न चांगल्याप्रकारे लावून दिले होते किंवा काय. हे म्हणणे खरे नाही की, वाद मालमत्ता रेवती राऊत हिच्या नावे करुन देण्याचा वामन यास पूर्ण अधिकार होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद मालमत्तेची किंमत आज रोजी वाढलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीची किंमत आज रोजी वाढली असल्याकारणाने वाद मिळकत बळकविण्याकरिता खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर केस बाबत कोणतीही माहीती मी दुय्यम निबंधक कार्यालयात दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बक्षीसपत्राबाबत मी दुय्यम निबंधक कार्यालयात कोणताही आक्षेप नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की वामन भगत हे सुरुवातीपासून रेवती राऊत व पार्वताबाई भगत यांच्या सोबत राहत होते. हे मला माहित नाही की, रेवती राऊत ही वामन भगत व पार्वताबाई भगत यांची देखरेख करीत होती किंवा काय. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या सांगण्यावरुन खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील व शपथपत्रातील मजकूर चूकीचा आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.01.07 11:15:09 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.01.07 11:15:19 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः ०६/०१/२०२६